नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/०४/२०२६ (बुधवार )

## केळवद पोलीस स्टेशन हद्‌दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत महीला आरोपीला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन केळवद हदद्‌ीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय महीला आरोपी नामे **वंदना किसना आत्रम, वय ४२ वर्षे, रा जटामखोरा, ता सावनेर, जि. नागपुर** हीला महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले.

नमुद सराईत गुन्हेगार **वंदना किसना आत्रम, वय ४२ वर्षे, रा जटामखोरा, ता सावनेर, जि. नागपुर** हीचे वर अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी हिचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी तिच्यावर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी हीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच तिच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव केळवद पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **वंदना किसना आत्रम, वय ४२ वर्षे, रा**

**जटामखोरा, ता सावनेर, जि. नागपुर हीला १ महीन्यांकरीता  नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०७/०४/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मानी मोहल्ला, भिवापूर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भिवापूर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) लक्ष्मन धनराज ढोणे, वय २६ वर्ष, रा. भिवापुर, ता. भिवापूर, जि. नागपूर २)  साहील सलीम पठान, वय २६ वर्ष, रा. भिवापुर, ता. भिवापूर, जि. नागपूर ३) अमोल आवारी, रा. भिवापुर, ता. भिवापूर, जि. नागपूर** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ११५०/—रूपये असा एकुण १२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०३ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०६ गुन्हे नोंद

दिनांक ०७/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण २९६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे जग्गू समारू रौतेल, वय ४९ वर्ष, रा. कांद्री माईन, वार्ड क्र. ४, ता. रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी क्र. १) नामे रामकिसन दौलतराव भोंडे, वय ५३ वर्ष, रा. वार्ड नं. २, माणिकवाडा, त. नरखेड २) सुधाकर नारायण शेंबेकर, वय ४९ वर्ष, रा. वार्ड नं. २, खैरगाव, त. नरखेड यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे रामचंद्र भाईलाल साहु, वय ४१ वर्ष, रा. माथणी, तह. मौदा, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी क्र. १) नामे विजय भिमराव धराळे, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. १, नांदोरी पोस्ट ढालगाव खैरी, ता. सावनेर २) प्रविण उर्फ बंटी तुकाराम बावने, वय ४० वर्ष, रा. भागेमाहेरी, ता. सावनेर याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद आहे.

**सदर कारवाईत ३०६० मिली देशी दारू, १५ लिटर मोहाफुल दारू असा एकुण २,९६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने

ɣ